Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

"जुनागड किल्ला (राजेवाडी), ता.अंबाजोगाई, जि.बीड"

सुशीलकुमार शं.सरवदे

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, तेरणा महाविद्यालय, उस्मानाबाद.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा एक प्रशासकीय विभाग आहे. यात औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, बीड, हिंगोली, उस्मानाबाद आणि लातूर या आठ जिल्हयाचा समावेश होतो. या मराठवाडयात प्राचीन संस्कृतीचा महान वारसा साठलेला आहे. यात प्रामुख्याने वास्तू, मंदीरे, गडकोट, मुर्ती, शिल्प इत्यादीचा समावेश होतो. या वास्तु संस्कृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाची भुमिका बजावतात. यामधील सर्वात मोठी भव्य दिव्य वास्तु म्हणजे किल्ला होय. या किल्ल्यांना दुर्ग, कोट व गड असेही म्हटले जाते. या किल्ल्यांना संरक्षण व प्रशासनाच्या दृष्टीने महत्वाचे स्थान म्हणुन पाहिले जात असे. अशा या किल्याची निमिर्ती सिंधु संस्कृतीपासून केली असल्याचे दिसते. कारण हडप्पा व महोजोदाडो यां शहरांना मोठी तटबंदी होती. या नंतरच्या काळात तर किल्ले महत्वाची ठिकाणे बनली. कौटिल्याने तर आपला सप्तांग सिध्दातात दुर्ग[१] याला एक राज्याचे महत्वाचा घटक माणले होते. मौर्य, गुप्त त्याचप्रमाणे दक्षिणेतील सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, चालुक्य आणि यादव राजघराण्यानी तर या किल्यांचा आधारावर आपली राजकीय कार्यकिर्द गाजविली.

यादव कालीन मराठवाड्यातील पुरातत्वीय अवशेषांचा अभ्यास करताना गडकोट व दुर्गांचे अनन्यसाधारण महत्व आहे. कारण मध्ययुगीन संरक्षण व्यवस्थेमध्ये या गडकोटांना महत्वाचे स्थान होते. सिडने टॉय म्हणतात, "यादवांचा देवगिरी हा अजो-ड व अजिंक्य किल्ला त्यांनी नैसर्गिक टेकडीचे गडात रुपांतर करुन उभारला. प्रत्यक्ष युध्दात तो कुणालाही जिंकता आला नाही. दगलबाजीनेच त्यावर हुकुमत स्थापन करण्यात आली" [२] यावरुन यादवकालीन गडकोटांची महती स्पष्ट होते. टॉय याने त्यास पूर्वेकडील जिबाल्टर असे म्हटले आहे [३] यादवांनी चालुक्य व राष्ट्रकुटाप्रमाणे सबंध पश्चिम भारतावर वर्चस्व स्थापन केले होते. त्यांनी आपला सत्ताविस्तार व संरक्षण या दोन्ही कार्यासाठी हे गडकोट वरदान ठरले. जे.एन.कमलापूर यांनी ही दक्षिणेतील किल्ल्यांचा अभ्यास केला आहे. त्यांनी यादवकाहीन देवगिरी, परंडा, उदगीर इत्यादी गडांची माहिती दिली आहे. [४] तसेच महाराष्ट्रातील आणि मराठवाडयातील गडकोटांबाबत गो.नी.दांडेकर, डॉ.गजकुमार शहा इत्यांदीनी लेखन केले आहे. यादव राजांनी वरील किल्ले बांधले परंतु त्यांच्या काळातील (राजेवाडी) जुनागड किल्याचा अभ्यास आभ्यासकांनी केला नाही.

अंबाजोगाई जि.बीडच्या पश्चिमेस वैणगंगा ही नदी असून तिची उपनदी निळगंगा आहे. या निळगंगा नदीच्या काठावर राजेवाडी हे गाव आहे. या गावापासुन दिड कि.मी.अंतरावर निळगंगेच्या काठावर जुनागड किल्ला आहे. त्याचा उल्लेख राजपत्रात किंवा अन्य ग्रंथात आलेला नाही.

या किल्ल्याचे बांधकाम यादव काळात झाले असावे. येथील किल्यातील वास्तु अवशेषाचे साम्य देवगिरीचा किल्ला व माहुर येथील रामगडशी आहे. राजेवाडी हे स्थळ अंबाजोगाई पासून १५ कि.मी. अंतरावर आहे. यादव काळात अंबाजोगाईला उपराजधानीचा दर्जा होता. या नगरावर आक्रमण झाले तर जुनागड किल्ल्यात आश्रय घेता यावा म्हणुन हा किल्ला सेनापती खोलेश्वरांच्या देखरेखीखाली उभारण्यात आला असावा हा किल्ला यादवांनी बांधला असल्याने येथील अवशेष्यावरुन निदर्शनास येते. या किल्याच्या पायथ्यास पुर्वेस नदीच्या काठावर विष्णूची आणि गजललक्ष्मीची (शिल्प) सापडली आहेत. [५] त्याचबरोबरच पश्चिमेस नंदीचे (महादेवाचे वाहन) शिल्प आहे. तसेच या निळगंगेच्या काठावर किल्ल्यापासुन १.५ कि.मी.अंतरावर निळकंठेश्वराचे हेमाडपंती मंदीर आहे. या मंदीरात शिवलिंग, बाहेर नंदी व इतर शिल्प अवशेष विखुरलेली आहेत. तसेच निळगंगेत मंदीराच्या समोर कुंड आहे. या जुनागड किल्ल्याच्या परिसरात बावशिध्द हे दुसरे हेमाडपंती मंदीरसुध्दा आहे. यावरुन हा किल्ला यादव राजवीटतच उभारण्यात आला असावा. [६]

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

(जुनागड किल्ल्या परिसरातील निळकंठेश्वर मंदीर)

(जुनागड किल्ला परिसरातील निळकंठेश्वर मंदिरासमोरील मुर्तीशिल्प)

किल्ल्याचे क्षेत्रफळ किल्ल्याच्या तटबंदीचे अवशेषावरुन जुनागड किल्ल्याच्या भौगोलिक विस्ताराची म्हणजेच आकारमानाची कल्पना येते. प्राचीन व मध्यमयुगीन काळात किल्ले ही सत्तेची मुख्य केंद्र होती. त्याप्रमाणे हेच किल्ले संरक्षणाची ठिकाण असे. या किल्ल्यातच जुनागड हे गाव वसलेले दिसते. आज जे राजेवाडी गाव अस्तित्वात आहे ते जुनागड येथून स्थलांतरीत झाले आहे. येथील काही लोकांची नावे गडकर आहेत. त्यांचे पुर्वज जूनागड येथील रहिवाशी होते. या किल्ल्याचे क्षेत्रफळ ४ ते ५ कि.मी.एवढे आहे.

खंदक :-

साधारणपणे किल्ल्याचे भूईकोट, डोंगरी आणि जलदुर्ग [७] असे तीन प्रकार पडतात. जुनागड किल्ला हा डोंगरी प्रकारात मोडतो. हा किल्ला बालाघाटाच्या डोंगररांगावर स्थीत आहे. या किल्ल्याच्या पूर्व आणि दक्षिण बाजूस निळगंगा नदी असून उत्तर बाजूस मोठी दरी आहे. तर फक्त पश्चिमेस सपाट भूप्रदेश आहे. त्या सपाट भू-प्रदेशावर खंदक आहे. शत्रूला किल्ल्यावर लवकर किंवा सहज हल्ला करता येवू नये म्हणुन तटबंदीच्या बाहेरुन खोल, रुंद, किंवा अरुंद असा चर- खोदलेला असतो. या खंदकात सततपाणी असते. या खोदलेल्या चरेला खंदक किंवा परिखा [८] असे म्हणतात. या खंदकाच्या

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

वरच्या बाजूस एक तलाव आहे. या तलावाचे पाणी खंदकात सोडण्यात येत असे. आजही खंदकाचे अवशेष येथे उपलब्ध आहेत. देवगिरी किल्ल्याप्रमाणे खंदकातून किल्ल्यात जाण्यासाठी लाकडी पुल येथे असावा.

(जुनागड किल्याची पूर्वेकडील बाजू)

(जुनागड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली गजलक्ष्मी शिल्प)

तटबंदी :-

सभोवती मजबुत भिंत जे स्थान निर्माण केले जाते त्याला किल्ला [९] असे म्हटले जाते. तर किल्ल्याच्या भोवती संरक्षणासाठी जी मोठी तटभिंत बांधली जाते तिला कोट, परकोट किंवा तटबंदी [१०] म्हणतात. जुनागड किल्ल्याच्या भोवती एकेरी तटबंदी होती. तटबंदीच्या बांधकामासाठी दगड, माती आणि विटांचा वापर केलेला आढळतो. या तटबंदीच्या बांधकामासाठी घडीव व ते साधे दगड वापरल्याचे दिसते. किल्ल्याच्या तटबंधीची रुंदी २ ते ३ मी.असून उंची ३० फुट आहे. काही ठिकाणी बांधकामासाठी चुन्याचा वापर केल्याचे दिसते.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

फांजी :-

किल्याच्या तटबंधीच्या माथ्याला फांजी [११] म्हणतात. पहाऱ्यासाठी गस्त घालताना सैनिकास यावरुन फिरता यावे यासाठी फांजीची बांधणी केलेली असते. या फांजीवर जाण्यासाठी तटबंदीला पायऱ्याचा जीना ठेवलेला असतो, अशी फांजी जुनागड किल्ल्याच्या तटबंदीला असावी.

बुरुज :-

किल्याच्या सभोवती संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या तटभिंतीत लहान मोठया आकाराचे अनेक बुरुज बांधण्यात येत असत. जुनागड किल्ल्याच्या तटबंदीत १० बुरुज असावेत. परंतु आज ३ बुरुज शिल्लक आहेत. यांची उंची ५० फुट आहे. त्यापैकी १ किल्ल्याच्या पूर्वेस आहे. तर दोन प्रवेशव्दाराया दोन्ही बाजूस आहेत. (या बुरुजाचा वापर टेहळणीसाठी व संरक्षणासाठी केला जात असे.) हे बुरुज साधारणपणे २० फुट रुंद आहेत. खालचा भाग दगडांनी बांधलेला तर वरचा भाग बांधण्यासाठी माती आणि चुन्याचा वापर केलेला दिसतो. या बुरुजांना जंग्या आहेत. किल्ल्यात तटबंदी, बुरुज, प्रवेशव्दार आणि चर्यातुन शत्रुवर मारा करण्यासाठी जी भोके, छिद्रे, झरोके किंवा खिडक्या ठेवलेल्या असतात त्यांना जंग्या [१२] असे म्हटले जाते. अशा जंग्या जुनागड किल्ल्याच्या तटबंदीला व बुरुजाला असाव्यात.

दर्गा :-

जुनागड किल्ल्याच्या वायव्य दिशेला एक दर्गा आहे. याचा अर्थ असा होतो की, यादव राजवटीवर येथे इस्लाम धर्मियांची सत्ता असावी. येथील दर्ग्याचे अवशेष फक्त आता शिल्लक आहेत. येथे दोन कबरी (समाधी) मात्र चांगल्या स्थितीत आहेत. परंतु हा दर्गा कोणत्या सुफी संताचा आहे, हे मात्र माहित होत नाही.

या किल्ल्यात इतर किल्ल्यातील वास्तू प्रमाणेच वास्तू असाव्यात असे तेथील अवशेषावरुन दिसुन येते. संशोधकाने प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन जुनागडच्या किल्ले अवशेषांवर प्रकाश टाकला आहे.

संदर्भ :-

1. Dutt B.B.Town Planning in Ancient India, Colcatta and Simla,1925. PP-70-71.
2. Toy Sidney, Strongholds of India, William Heinemann, London, Ltd. P.33
3. I bid, P. 34.
4. Kamplapur J.N. (1961), “The Decoon Fort’s” Popular Book Depot, Bombay P. 110
5. सरवदे एस.एस.जुनागड अवशेषांवर नवा प्रकाशझोत, भारतीय इतिहास संस्कृती मुंबई, लेख स्वीकृत.
6. कित्ता क्र. २.
7. Narvane M.S. (1995), Forts of Marathwada, APH publishing corporation, Delhi, P-33.
8. घाणेकर प्र.क्रे . (२००५), अथातो दुर्ग जिज्ञासा स्नेहल प्रकाशन, तिसरी आवृत्ती पुणे क्र. १०६.
9. जोशी महादेव शास्त्री (संपा), (१९८५), भारतीय संस्कृती कोश, पुणे, भारतीय संस्कृती कोश मंडळ, खंड-२ क्र. ३५५.
10. Sinha Aonar, Ancient Indian For Architecture, Vihwa Prakashan Delhi, P. 52.
11. घाणेकर प्र.के. (२००५), उपरोक्त क्र. १२१.
12. कित्ता क्र. ११४.